## निशाणी क्र. १४ खालील आदेश

**१.** प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचे विरूद्ध झालेला ''विनाकैफियत चौकशी '' आदेश रद्द होवून कैफियत दाखल करून घेण्याबाबत आदेश होवुन मिळण्यास दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील प्रतिवादीचे कथनानुसार,प्रस्तूतचा दावा वादी यांनी लॉकडाउनच्या काळात दाखल केलेला असून दाव्याचे समन्स देखील प्रतिवादी यांना लॉकडाउनच्या काळातच प्राप्त झालेले आहे. प्रतिवादी यांना लॉकडाउनमुळे कैफियत दाखल करण्यासाठी आवश्यक असणारे जुणे कागदपत्रे शासकीय कार्यालय बंद असल्याकारणाने मुदतीत उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे या प्रतिवादी यांना कौफियत दाखल करणेस विलंब झाल्याचे नमूद केलेले आहे. पुढे अर्जातील प्रतिवादींचे कथनानुसार वादी मुददामहुन लॉकडाउनच्या काळात दावा मिळकत हडपण्यासाठी एकतर्फा निकाल घेण्याच्या प्रयत्नात असून तसे झाल्यास प्रतिवादींचे अतोनात नुकसान होणार आहे. सदर प्रतिवादींनी मुद्दामहून अथवा हेतुपुरस्पर विलंब केलेला नसून प्रतिवादी यांना कैफियत देवून बचाव मांडण्याची संधी देणे गरजेचे असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल केले असून वादीचे म्हणन्यानुसार, प्रतिवादींचा अर्ज बेकायदेशिर असून अर्जात दिलेले कारण खोटे व लबाडीचे आहे. प्रस्तूत दाव्यास विलंब व्हावा याकरीता तसेच प्रतिवादी यांनी मुददामहुन वादीस त्रास देण्यास याकरीता प्रस्तूतचा खोटा अर्ज दाखल केलेला असल्याने तो नामंजुर करावा. यदाकदाचीत अर्ज मंजुर करण्याचे झाल्यास प्रतिवादींवर २,०००/- रूपये दंड आकारण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**४.** प्रतिवादीचा अर्ज व त्यावरील वादीने दिलेले म्हणणे वाचले. वादी-प्रतिवादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. १ ते ४ विरूद्ध दि. ०४/११/२०२० रोजी '' विनाकैफियत चौकशी आदेश '' पारीत झालेला दिसून येत असून त्याअगोदर म्हणजेच दिनांक १०.०७.२०२० रोजी सदर प्रतिवादी यांच्यावर दाव्याचे

नोटीस बजावल्याचे दिसून येते. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दाव्याचेकामी गैरहजर असून प्रतिवादी यांना सुमारे दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीने सदरचा अर्ज दाखल केलेला असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रतिवादी क्र. १ ते ४ ची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करणेस मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. १ ते ४ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना आपले म्हणने कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो दंड आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**-: आदेश :-**

**१.** प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी नं. १ ते ४ विरूद्ध झालेला ''विनाकैफियत चौकशी '' असा आदेश रक्कम रू. ४००/- चा दंड वादींना देण्याच्या अटीवर रद्द करणेत येतो. प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्या नंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

**सही/-**

दिनांक : २२/१२/२०२०.

पी. व्ही. सपकाळ
दिवाणी न्यायाधीश, जामखेड.